क्रमांक: एलआरएफ-२६८२/११९१०/प्र.क्र. ३४४१/[ग६]ज३.

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २७ जुलै, १९८९

विषय:- जमीन-मुंबई उपनगर जिल्हा
सि. टी. एस. नं. ४४५९ मौजे कोलेकल्याण
तालुका अंधेरी येथील जागा हिंदसेवा परिषदेस
शाळेच्या इमारतीसाठी व क्रीडांगणासाठी
मंजुर करण्याबाबत.

ज्ञापन:-

अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या क्रमांक: सी/कार्यासन -३/जमीन-२ब/सीआर-१०२१, दिनांक ५.८.१९८६ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञाप्तिपूर्वक असे कळविण्याचा मला निदेश आहे की, हिंद सेवा परिषद, मुंबई ८ सहकार सदन, अलका नगर, सांताक्रुझ [पूर्व] ह्या संस्थेला तिच्या शाळेच्या इमारतीसाठी व क्रीडांगणासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सरकारी जमीन देण्यास शासन मंजुरी देत आहे :-

| अ. क्रमांक | प्रयोजन | सर्व्हे नं. | क्षेत्र | अटी व शर्ती. |
|---|---|---|---|---|
| १. | शाळेची इमारत | मौजे कोलेकल्याण तालुका अंधेरी येथील सि. स. क्र. ४४५९. | २००० चौ. मी. | महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमीनीची विल्हेवाट] नियम, १९७१ मधील नियम ५ व ६ आणि शासन ठराव, महसूल व वन विभाग, क्र. एल-आरएफ-१०८३/१४९६/३७००/ग६ दि. ११ मे १९८४ अनुसार उक्त जमिनीच्या दि. १ फेब्रुवारी, १९७६ रोजी असलेल्या बाजार भावाच्या किंमतीच्या २५% इतकी कब्जेहक्काची तात्पुरती किंमत आकारून आणि शासन परिपत्रक, म. व व. वि. क्र. एल-आरएफ-१०८३/७११३४/सीआर ३४७८/ग६, दि. ८फेब्रुवारी ८३ मधील परिच्छेद १० व १२ मधील अटी व शर्ती व पुढे नमूद केलेल्या विशिष्ट अतिरिक्त शर्ती. |

अप्पर जिल्हाधिकारी ... कार्यालय
29 JUL 1989
13648

....२/-

| | | | |
|---|---|---|---|
| २. क्रीडांगण | मौजे कोलेकल्याण तालुका अंधेरी, येथील सि.स.क्र. ४४५९ | १२१४.६ चौ.मी. | उपरोक्त नियमातील नियम ७ आणि दि. ११ मे १९८४ च्या ठरावातील तरतुदीनुसार दि. १ फेब्रुवारी १९७६ रोजीच्या सदर जमिनीच्या बाजार-भावाच्या किंमतीच्या १०टक्के रकमेच्या ८टक्के इतके/भाडे प्रतिवर्षी आकारून १५ वर्षाच्या भाडेपट्टयाने व उपरोक्त दि. ८ फेब्रुवारी १९८३च्या परिपत्रकातील परिच्छेद ११ मधील अटी व शर्ती आणि पुढे नमूद केलेल्या विशिष्ट अतिरिक्त शर्ती. |

total 2,45,055 33,50,550
10% 2,45,055 3,35,055/- तात्पुरते
8% 19,606.40 2,68,0.40
87,500.00 87,500.00
1,07,106.40 90,180.40

## अतिरिक्त शर्ती:-

[अ] हिंदसेवा परिषद, मुंबई या संस्थेच्या इमारतीच्या बांधकामाच्या एकूण अंदाजित रु. २०/- लाख खर्चाच्या २५टक्के इतकी रक्कम म्हणजे रु. ५ लाख इतकी रक्कम संस्थेकडे या प्रकल्पासाठी बॅंकेत शिल्लक असल्याचा प्रत्यक्ष पुरावा द्यावा व तात्पुरत्या कब्जा-हक्काची रक्कम भरावी.

[ब] वरील प्रमाणे आकारण्यात आलेली कब्जाहक्काची रक्कम/भाडे हे तात्पुरते आहे. सहाय्यक संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग यांनी प्रश्नाधीन जमिनीची अंतिम किंमत निश्चित केल्यानंतर तात्पुरती कब्जाहक्काची रक्कम/भाडे व अंतिम कब्जा-हक्काची रक्कम/भाडे यांतील फरकाची रक्कम त्यावरील प्रचलित दराने देय ठरणाऱ्या व्याजासह शा.तनास भरण्यास येईल. असे लेखी मुद्रांकित हमीपत्र संस्थेने दिल्याशिवाय तसेच वरील [अ] येथील अटींची पूर्तता झाल्याशिवाय जमिनीचा ताबा संस्थेला देण्यात येऊ नये.

[क] संस्थेच्या इमारतीचे बांधकाम दोन वर्षात पूर्ण करू असे हमीपत्र संस्थेकडून घ्यावे. इमारतीच्या बांधकामाच्या तळपृष्ठाची पातळी जमिनीपासून ३. २५ एमजीटीएम असावी.

[ड] अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना योग्य वाटतील अशा अतिरिक्त अटी व शर्ती संस्थेला बंधनकारक राहातील.

२. हे ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने हया विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८२९/व्यय-९, दि. ३.८.१९८८ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

292



३. प्रकरणाचे चौकशी कागदपत्रे सोबत परत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[जयंत व. दिवाण]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

सोबत:-चौकशी कागदपत्रे.
[१ संचिका]

प्रति,
अप्पर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा.
जुने जकात घर,
फोर्ट, मुंबई.

प्रतिलिपी:-

१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२] जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख महाराष्ट्र राज्य, पुणे.
३] उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण प्रदेश, केसर-ए-हिंद बिल्डींग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई.
४] महालेखा-पाल, महाराष्ट्र राज्य[१]मुंबई.
५] महालेखापाल[लेखा व अनुज्ञेयता]महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६] महालेखापाल, महाराष्ट्र राज्यमुंबई[२]नागपूर.
७] महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता ]महाराष्ट्र राज्य, [२]नागपूर
८] नगर विकास विभाग. मंत्रालय, मुंबई.
९] वित्त विभाग [व्यय-९]
१०]शिक्षण व सेवा योजन विभाग/माशि-३[ ३प्रती]
११]गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग/का-१३
१४]सहाय्यक संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, मुंबई.
१५]निवड नस्ती, ज-३ कार्यासन, म. व व. वि.

क्र.१३/६४५९/२३/एल-२११/

अपर जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,
जुने जकात घर, मुंबई ४०० ०२३.

दिनांक :- 20 डिसेंबर, १९८९.

<u>वाचले :-</u> १) हिंद सेवा परिषद यांचा अर्ज दिनांक १.१२.८२ व ५४८ पत्र दिनांक १२.१०.८९.

२) शासन महसूल व वन विभागाचे ज्ञापन क्र.एल.आर.एफ.२६८२/११११०/ प्र.क्र.१४४१ (ग-६)ज-१ दिनांक २७.७.८९.

<u>आदेश :-</u>

शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र.एल.आर.एफ.२६८२/११११०/प्र.क्र. १४४१/(ग-६)ज-१ दिनांक २७.७.८९ अन्वये मौजे कोलेकल्याण तालुका अंधेरी येथील गावठाणाजवळील सरकारी तलावाचे जमीनीपैकी न.भू.क्र.६६५९ क्षेत्र १९१४-६ चौरस मीटर जमीन शाळेच्या क्रिडांगणासाठी दिनांक १.२.१९७६ रोजीच्या उक्त जमिनीच्या बाजारभावाच्या किंमतीच्या १० टक्के रकमेच्या ८ टक्के इतके भाडे प्रतिवर्षी आकारुन १५ वर्षांच्या भाडेपट्ट्याने हिंद सेवा परिषद मुंबई ८ सहकार सदन, कलका नगर सांताक्रुझ (पूर्व) ह्या संस्थेला देण्यास शासनाने मंजुरी दिली असुन खालील अटी व शर्तींवर जमिनीचा ताबा देण्यासंबंधी आदेश देण्यात येत आहेत.

१) भाडेपट्ट्याची मुदत १५ वर्षे असेल व सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभागाकडुन उपरोक्त जमिनीची अंतिम किंमत निश्चित होईपर्यंत दिनांक १.२.७६ रोजीच्या तात्पुरत्या निश्चित केलेल्या भावाप्रमाणे म्हणजे प्रत्येक चौरस मीटर रुपये १७५/- (एकशे पंच्याहत्तर) या भावाने प्रति वर्षी रुपये २६८०=५० इतकी भाडेपट्ट्याची रक्कम भरावयाची आहे. जमिनीची अंतीम किंमत ठरल्यानंतर त्या दराने प्रतिवर्षी भाडे भरावयाचे असुन सध्या लावण्यात आलेला तात्पुरता बाजारभाव व अंतीमरित्या ठरविण्यात येणारा बाजारभाव यातील फरकाची रक्कम व्याजासह संस्थेने त्वरीत भरणा करावयाची आहे.

२) पट्टेदार (परिषद) क्रिडांगणाच्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कामासाठी जमिनीच्या उक्त तुकड्याचा वापर करणार नाही. तसेच उक्त १९१४.६ चौ.मी. ह्या क्षेत्राचा चटई क्षेत्र बांधकामा साठी वापरणार नाही.

३) शासनाच्या शैक्षणिक विभागाकडुन/शासनाकडुन देण्यात आलेली हिंदसेवा परिषद ह्या संस्थेची मान्यता बंद झाल्याच्या प्रसंगी पट्टा बंद झाल्याचे समजण्यात येईल.

क्र.मा.पहा.

४) संस्था (पटटेदार) जिल्हाधिका-यांकडून या बाबतीत प्राधिकृत करण्यात येईल अशा सरकारी अधिका-यांना सर्व वाजवी वेळात जमिनीच्या उक्त तुकड्याच्या कोणत्याही भागात प्रवेश करून त्याचे निरीक्षण करण्यास परवानगी देईल.

५) संस्था जमिनीचा उक्त तुकडा किंवा त्यांचा कोणताही भाग पोट भाड्याने देणार नाही किंवा त्यावर कोणताही भार निर्माण करणार नाही.

६) संस्था जिल्हाधिका-याच्या लेखी पूर्व परवानगी शिवाय, जमिनीच्या उक्त तुकड्यावर कोणतेही बांधकाम करणार नाही.

७) जिल्हाधिका-याच्या मते जर सरकारच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या प्रयोजना करिता जमिन आवश्यक असेल तर जिल्हाधिकारी त्या बाबतीत संस्थेला एका कॅलेंडर महिन्याची लेखी नोटीस देऊन हा पटटा कोणत्याही वेळी रद्द करु शकेल.

८) संस्था जमिनीच्या उक्त तुकड्यावर निश्चित करण्यात आलेला भाडेपटटा वेळोवेळी बसविण्यात येईल अशा उपकरासह दरवर्षी ऑगस्टच्या पहिल्या तारखेस जिल्हाधिकारी/तहसिलदार यांच्याकडे आगाऊ भरील.

९) जमिनीचा उक्त तुकडा आणि त्यावरील सर्व बांधकामे नगर पालिका कर आकारणीस आणि स्थानिक प्रयोजनाकरिता बसविण्यात आली असेल किंवा नंतर बसविण्यात येईल अशा कोणत्याही आकारणीस अधिन असतील आणि उक्त जमिनीच्या किंवा तीवरील कोणत्याही बांधकामाच्या संबंधात महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६च्या कलम ६४ च्या दुस-या परिच्छेदात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत योजिलेल्या स्वरुपाची कोणतीही आकारणी, कर, उपकर, यास सुद्धा अधिन असेल.

१०) या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीन्वये पटटा समाप्त करण्यात आल्याच्या प्रसंगी, पटटा समाप्त झाल्याबद्दल पटटेदाराना कोणत्याही भरपाईदाखल दावा सांगण्याचा अधिकार असणार नाही. पटटेदार शर्त ७ अन्वये पटटा समाप्त करण्यात आला असेल तर उक्त खंडान्वये दिलेल्या नोटीशीची मुदत संपण्यापूर्वी आणि इतर बाबतीत जिल्हाधिकारी निश्चित करील अशा मुदतीत, स्वखर्चाने जमिनीच्या उक्त तुकड्यावर उभे असलेले कोणतेही बांधकाम किंवा बांधकामे काढून टाकील. आणि उक्त कालावधी संपल्या नंतर कुव्यहिवाट सुरु होण्याच्या वेळी जमिनीचा उक्त तुकडा ज्या स्थितीत होता त्याच स्थितीत त्याचा कब्जा जिल्हाधिका-यांच्या स्वाधिन

३/-

करील.

११) जिल्हाधिका-यास योग्य वाटतील अशा शर्तींवर पट्ट्याचे आणखी मुदती पर्यंत नवीकरण करण्यांत आले नसेल तर, पट्टेदार कोणताही अडथळा न आणता व शांततापूर्वक उक्त मुदत संपल्यावर जमिनीच्या उक्त तुकड्याचा कब्जा त्याने तो तुकडा ज्या स्थितीत घेतला असेल त्याच स्थितीत देईल.

१२) पट्ट्याच्या उक्त शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे किंवा जमिन महसूल अधिनियम १९६६ च्या किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या कोणत्याही उपबंधाचे पालन करण्यांत कसूर झाल्यास जिल्हाधिका-याकडून उक्त पटटा रद्द होण्यास पात्र ठरेल आणि त्यानंतर तो जमिनीच्या उक्त तुकड्याचा कब्जा ताबडतोब परत घेईल आणि नोटीस किंवा कोणतीही भरपाई दिल्या शिवाय, पट्टेदाराला संक्षिप्त चौकशी करून काढून लावील किंवा अशा रीतीने जमिनीचा कब्जा परत घेण्या ऐवजी, या पट्ट्याची शर्त ६ च्या विरोधी असेल असे उक्त जमिनीवर उभारलेले कोणतेही बांधकाम जिल्हाधिकाऱ्यांकडून निश्चित करण्यांत येईल अशा कालावधीत पाडून टाकण्यात येईल आणि उक्त कालावधीत उक्त बांधकाम पाडून टाकण्यात आले नाही तर पट्टेदाराच्या खर्चाने ते पाडून टाकण्याची व्यवस्था करील आणि राज्य शासनाच्या आदेशांना अधीन राहून परिस्थितीनुसार, त्याला इष्ट वाटेल अशा वरील पैकी एका किंवा दुसऱ्या उपायाचा अंगीकार करणे हे जिल्हाधिका-याच्या एकाच स्वेच्छा निर्णयावर अवलंबून असेल. जिल्हाधिका-यांनी शर्त २ चे उल्लंघन झाल्याच्या बाबतीत, संपूर्ण दंड व जमिनीच्या संबंधातील अकृषिक आकारणीच्या चाळीस पटी पर्यंत वाढविता येईल असा दंड बसविणे हे विधीसंमत असेल.

१३) या पट्ट्यातील "पट्टेदार" या संज्ञेमध्ये, पट्टेदार, त्याचे वारस उत्तराधिकारी, कायदेशीर प्रतिनिधी आणि अनुज्ञात अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल आणि "जिल्हाधिकारी" या संज्ञेमध्ये त्या त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आणि पट्ट्यान्वये जिल्हाधिका-याच्या शक्तींचा वापर करण्यासाठी राज्य शासन ज्याची नेमणूक करील असा कोणताही इतर अधिकारी यांचा समावेश होईल.

१४) जिल्हाधिकारी संस्थेस ज्या वेळी करारनाम्यावर सही करण्यास बोलावतील त्यावेळी ते हजर राहून करारनाम्यातील शर्ती व अटी मान्य असल्याबाबत करारनाम्यावर सह्या करतील.

(सही) २०।१२

अपर जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाधिकारी

प्रति,

स्थळप्रतीवर अपर जिल्हाधिकारी
यांनी सही केली असे

श्री. वाय. एन. दुबे,
हिंद सेवा परिषद मुंबई
८ सहकार सदन, अलका नगर
सांताक्रुझ (पूर्व) मुंबई ४०००५५.

क्रमांक- एलआरएफ-२६०७/१०३९/प्र.क्र.२५४/ज-२

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ३१ ऑगस्ट, २००९

विषय :- <u>जमीन- मुंबई उपनगर जिल्हा</u>
मौजे कोलेकल्याण, ता.अंधेरी, नभूक्र.४४५९ येथील
हिंद सेवा परिषद यांना क्रिडांगणाकरीता प्रदान करण्यात
आलेल्या जमिनीच्या भाडेपट्टा नुतनीकरणाबाबत

<u>ज्ञापन</u> :-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्र.११/३ डी/एल-२३७, दिनांक २९/०८/२००७ च्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, हिंद सेवा परिषद या संस्थेस शासन ज्ञापन क्र.एलआरएफ-२६८२/११९१०/प्र.क्र.३४४१/(ग-६)/ज-३, दिनांक २७/०७/१९८९ अन्वये मौजे कोलेकल्याण, ता.अंधेरी येथील नभूक्र.४४५९ मधील खेळाचे मैदान (क्रिडांगण) या प्रयोजनासाठी १५ वर्षे भाडेपट्टयाने मंजूर करण्यात आलेल्या १९१४.६ चौ.मी. जमिनीची दिनांक २५/०५/२००५ रोजी संपुष्टात आलेली भाडेपट्टयाची मुदत दिनांक २५/०५/२००५ च्या पुढे १५ वर्षांकरीता, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ मधील नियम-७ मधील तरतुदीनुसार तसेच शैक्षणिक संस्थांना जमीन प्रदान करण्याबाबतच्या शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक-एलआरएफ-१०८३/ १४९६/प्र.क्र.३७००/ग-६, दिनांक ११/०५/१९८४ मधील तरतुदीनुसार, सदर जमिनीची सहाय्यक संचालक, नगररचना यांनी निर्धारित केलेल्या दिनांक ०१/०२/१९७६ रोजी करण्यात येणा-या मूल्यांकनावरील रकमेच्या १०% रकमेवर ८% प्रमाणे वार्षिक भाडे आकारुन खालील अटी/शर्तीवर वाढवून देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

अटी:- १) शासनाने भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनीचा भाडेपट्टा संपुष्टात आल्यानंतर भाडेपट्टा वाढवून देण्यासाठी शासन स्तरावर सुधारित धोरण विचाराधीन असून सदर सुधारित धोरण अंतिम झाल्यास त्यामधील तरतुदी भाडेपट्टेधारकास लागू राहतील, असे बंधपत्र भाडेपट्टेधारकाकडून घेण्यात यावे.

२) भाडेपट्टयाचे नुतनीकरण मूळ भाडेपट्टयातील अटी व शर्तीनुसार करण्यात यावे.

३) जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी व शर्ती.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज. का. घरत)
उप सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

23 SEP 2009
19964

WS- 421

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com

213

क्रमांक :७७/ कार्या-३ डी/एल-२३७
दिनांक ; /११/२००९
5 NOV 2009

**वाचले :** १) शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.एलआरएफ-२६८२/ ११९१०/ प्र.क्र.३४४१/(ग-६)/ ज-३ दि.२७/७/८९

२) या कार्यालयाचे आदेश क्र.१६/४४५९/३अ/एल-२३१ दि.२७/१२/८९

३) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र.एलआरएफ-२६०७/१०३९/प्र.क्र.२५४/ज-३ दि.३१/८/२००९.

**आदेश :**

शासन, महसूल व वन विभागाकडील उपोद्घातातील अ.क्र.१ कडील शासन ज्ञापनान्वये मौजे कोलेकल्याण ता. अंधेरी येथील गावठाणा जवळील सरकारी तलावाचे जमीनीपैकी नभूक्र.४४५९ क्षेत्र १९१४.६ चौ.मी. जमिन शाळेच्या क्रिडांगणासाठी दि.१/२/१९७६ रोजीच्या उक्त जमिनीच्या बाजार भावाच्या किंमतीच्या १०% रक्कमेच्या ८% इतके भाडे प्रतिवर्षी आकारुन १५ वर्षाच्या भाडेपट्टयाने हिंद सेवा परिषद या संस्थेस मंजुर करण्यांत आली होती. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे आदेश दि.२७/१२/८९ रोजी निर्गमित करणेंत आले आहेत. सदरचे जमिनीचा ताबा संस्थेला दि.२६/५/९० रोजी दिला होता.

प्रकरणी सदरची भाडेपट्टयाची मुदत दि.२५/५/२००५ रोजी संपुष्टात आली आहे.

आता, उपोद्घातातील अ.क्र.२ कडील शासन ज्ञापनान्वये सदर जमिनीची दि.२५/५/२००५ रोजी संपुष्टात आलेली भाडेपट्टयाची मुदत पुढे १५ वर्षाकरीता महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम-१९७१ मधील नियम-७ मधील तरतुदीनुसार तसेच शैक्षणिक संस्थाना जमिन प्रदान करण्याबाबतच्या शासन परिपत्रक-महसूल व वन विभाग क्र.एलआरएफ-१०८३/१४९६/प्र.क्र.३७००/ग-६ दि.११/५/१९८४ मधील तरतूदीनुसार सदर जमिनीची सहाय्यक संचालक नगर रचना यांनी निर्धारित केलेल्या दि.१/२/१९७६ रोजी करण्यांत येणाऱ्या मुल्यांकनावरील रक्कमेच्या १०% रकमेवर ८% प्रमाणे भाडे आकारुन अटी / शर्तीवर वाढवून देण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

प्रस्तुतचे प्रकरणी या कार्यालयाचे आदेश दि.२७/१२/१९८९ अन्वये सदरच्या जमिनीचा तात्पुरता बाजार भाव रक्कम रु.१७५/- प्रती.चौ.मी. इतका ठरविण्यांत आला होता. तोच बाजार भाव शासन, महसूल व वन विभागाकडील पत्र क्र.एलआरएल-२६९२/११९१/प्र.क्र.३४०१/ग-६/ज-३ दि.८/६/९३ अन्वये अंतिम बाजार भाव असल्याचे कळविण्यांत आले आहे.

सबब, प्रस्तुतच्या जमीनीचे दि.१/२/१९७६ चे मुल्यांकन रक्कम रु.१७५/- प्रती चौ.मी. प्रमाणे १९१४.६ चौ.मी. जमीनीच्या किंमतीच्या १०% रक्कमेच्या ८% इतकी म्हणजेच रक्कम रु.२६८०.५० इतकी वार्षिक भाडेपट्टयाची

रक्कम आकारुन खालील अटी / शर्तीवर मे. हिंद सेवा परिषद यांना भाडेपट्ट्याने देण्यांत आलेल्या जमिनीची दि.२५/५/२००५ रोजी संपुष्टात आलेली भाडेपट्ट्याची मुदत पुढील १५ वर्षाकरीता म्हणजेच दि.२५/५/२०२० पर्यंत वाढवून देण्यांत येत आहे.

**अटी / शर्ती :**

१) भाडेपट्टेदार यांनी सन २००५ ते २००९ या ४ वर्षांच्या कालावधीची थकित भाडेपट्ट्याची रक्कम रु.१०,७२२/- तात्काळ या कार्यालयात जमा करावी.

२) शासनाने भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनी या भाडेपट्टा संपुष्टात आल्यानंतर भाडेपट्टा वाढवून देण्यासाठी शासन स्तरावर साधारित धोरण विचाराधीन असुन सदर सुधारीत धोरण अंतिम झाल्यास त्यामधील तरतूदी भाडेपट्टा धारकास चालु राहतील असे बंधपत्र भाडेपट्टेदार संस्थेने या कार्यालयास सादर करावे.

३) या कार्यालयाचे आदेश दि.२७/१२/१९८९ मधील सर्व अटी / शर्ती भाडेपट्टेदार संस्थेवर बंधन कारक राहतील.

४) भाडेपट्टेदार यांना प्रचलित स्वरुपाचा भाडेपट्टा करारनामा करावा लागेल.

५) वरील पैकी कोणत्याही अटी / शर्तीचा भंग झाल्यास या कार्यालयाचे आदेश दि.२७/१२/१९८९ मधील शर्त क्र.१२ नुसार पुढील योग्य ती कारवाई करणेंत येईल.

६) वरील सर्व अटी / शर्ती मान्य असल्याबाबतचे रक्कम रु.२२०/- च्या स्टॅम्प पेपरवरील हमीपत्र या कार्यालयास सादर करावे.

स्वाक्षरीत मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

प्रति,
अध्यक्ष
हिंद सेवा परिषद,
८, सहकार सदन, अलका नगर,
सांताक्रुझ (पु), मुंबई-४०० ०५५.

Recived Copy
(Rajesh Y. DUBE) 9870304287.

प्रत :

१) मा. अपर मुख्य सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांचेकडे माहिती करीता सविनय सादर.

२) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे माहिती करीता सविनय सादर.

३) तहसिलदार अंधेरी यांजकडे माहीतीकरीता रवाना.

४) नगर भूमापन अधिकारी, बांद्रा यांचेकडे माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

स्वाक्षरीत मा. जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता